

# ‘तेभागा’ चळवळीतील स्त्रियांचा सहभाग

बंगालमधील जमीनदारांच्या जोखडाखाली तेथील श्रमिक शेतकरी आणि कूळवर्ग किती भरडला जात होता ह्याची इतिहासात नोंद आहे. जमीनदारीतील शोषणातून अंशतः तरी त्याची मुक्तता व्हावी ह्यासाठी ‘तेभागा’ चळवळ बंगालमध्ये १९४६ ते १९५० ह्या काळात उभी राहिली. बंगालमध्ये कुळाला एकूण उत्पादनातील निम्मा भाग जमीनदाराला खंड म्हणून द्यावा लागे. अवजारे कुळाचीच असत. खावटीसाठी अनेकदा जमीनदाराकडून कर्ज घ्यावे लागे. त्यामुळे तो पूर्णपणे जमीनदारावर अवलंबून असे. आर्थिक, सामाजिक सर्वच बाजूने तो नाडला जाई.

‘तेभागा’ चळवळीची प्रमुख मागणी अशी– एकूण उत्पादनाचे ३ भाग ‘तेभाग’ करावे. २ भाग कुळाला व १ भाग जमीनदाराला अशी त्याची वाटणी व्हावी. १९३० मधील जागतिक महामंदीची झळ व १९४३-४४ मधील भयंकर दुष्काळ याच्या तडाख्यात बंगालमधील गरीब शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस अधिक हलाखीची होत होती. तेभागा चळवळीच्या सुरवातीस बंगालमधील ६० टक्के जमीन खंडाने कसली जात होती. कर्जामुळे निम्मे पीकही शेतकऱ्यांच्या हाती लागत नसे. बहुसंख्य गरीब शेतकऱ्यांना संघटीत करेल अशी ‘तेभाग’ ची मागणी किसान सभेने उचलून धरली. नवाखली सारख्या ठिकाणी जातीय दंगलीने एवढे उग्र स्वरूप धारण केले होते– त्याच वेळी या चळवळीत हिंदू-मुसलमान-आदिवासी सारे एकजुटीने लढत होते. या चळवळीची अशी जी अनेक वैशिष्ठ्ये होती त्यापैकीच त्यामध्ये स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग हे होय. त्याचा विचार येथे आपण करणार आहोत.

## महिला आत्मरक्षा समिती

१९४३ नंतर बंगालमध्ये खेडोपाडी किसान सभा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्या. याच सुमारास कलकत्त्यातील स्त्रियांच्या एका गटाने ‘महिला आत्मरक्षा समिती’ स्थापन केली. १९४३ च्या भीषण दुष्काळात निराधार स्त्रिया व मुले यांना मदत करण्यासाठी दूध-केंद्रे, पेज केंद्रे, आणि कामाची केंद्रे उघडण्यात ह्या समितीने पुढाकार घेतला. दुष्काळ निवारणाच्या कामाखेरीज स्त्रियांना शिक्षण देणे, राजकीय प्रश्नावर जागृत करणे. इ. कामेसुद्धा ही समिती करू लागली. त्यांनी साक्षरता प्रसारासाठी मोहिमा काढल्या, सांस्कृतिक कार्यक्रम केले. स्त्रियांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेणे, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र बनविणे यामधूनच स्त्रियांची स्थिती सुधारेल अशी या समितीची भूमिका होती. यादृष्टीने सूतकताई व विणकर स्त्री कामगारांची संघटना

बांधली. स्त्रियांनी पैदास केलेली अंडी, कोंबडचा भाजीपाला इत्यादी विकून आलेल्या पैशाचा विनिमय करण्याचा हक्क स्त्रियांनाच असला पाहिजे असे मांडले. खेडे पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत समित्या निवडण्यात आल्या. तेभागा चळवळीस सुरवात झाली त्यावेळी बंगालमधील काही विभागात अशा प्रकारे स्त्रियांच्या संघटना स्थापन झालेल्या होत्या त्यांचे स्वरूप व काम वेगवेगळचा ठिकाणी वेगवेगळे होते.

स्त्रियांना कोणत्याही कामात सहभागी करून घेण्यात येणाऱ्या अडचणी आणि मुख्य म्हणजे स्त्री संघटकांचा अभाव यामुळे या संघटना विशेष क्रियाशील नव्हत्या. मदत कार्याखेरीज इतर काम, चर्चा इ. जेव्हा या संघटना हाती घेत त्यावेळी त्यांना कुटुंबीय, जातभाई, खेडचातील रहिवासी यांच्याकडून विरोध होई. स्त्रीच्या पूर्वीपासून चालत आलेल्या परावलंबी प्रतिमेला तडा जाईल म्हणून स्त्रियांना विचार करण्यास चालना देणाऱ्या क्रियेला विरोध होत होता. स्त्रियांना काम मिळाले पाहिजे या मागणीला "घर कामाचे काय ?" या भूमिकेतून विरोध केला गेला.

या संघटनेतील बहुतेक स्त्रिया मध्यम शेतकरी वर्गातील होत्या. अगदी गरीब शेतमजूर स्त्रिया, महिला आत्मरक्षा समितिमध्ये सामील करून घेणे कठीण जाई. कारण त्यांना पोटाची भ्रांत होती. तेव्हा तो प्रश्न सोडवल्याखेरीज इतर गोष्टीचा विचार करणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे गरीब शेतकरी, शेत-मजूर स्त्रियांच्या संघटनामधे व्यवहारिक अडचणीही खूप होत्या. कारण घरकाम व शेतावरील काम अशा दुहेरी ओझ्याखाली त्या दडपलेल्या होत्या. छोटचा सभा घेण्यासाठी सुद्धा त्यांना फक्त एकच वेळ उपलब्ध असे, आणि तो म्हणजे दुपारी विश्रांती घेण्या ऐवजीचा वेळ. त्यामुळे ह्या स्त्रियांचा संघटनेतील सहभाग वाढू शकत नाही.

'तेभागा' चळवळीमध्ये मात्र स्त्रियांच्या सहभागाचे स्वरूप वेगळे होते. जसजशी चळवळीची तीव्रता वाढली तसे अधिकाधिक शेतकरी त्यात ओढले गेले. आणि त्यामध्ये स्त्रियाही होत्या. या चळवळीत स्त्रियांनी विविध पातळीवर भाग घेतला. किसान सभेच्या स्वयं-सेवकांच्या संरक्षणाखाली त्यांनी जमीन कसली रात्रीच्यावेळी खेडचाचे संरक्षण करण्याच्या कामातही स्त्रिया होत्या. सभा, निदर्शने, जमिनदारांकडे पाठविण्यात येणारी प्रतिनिधी मंडळे या सर्वांमध्ये स्त्रियांचा सहभाग होता. मात्र फारच क्वचित खेडचातील चळवळीविषयी संघटन करण्यासाठी निवडलेल्या समितीवर त्यांची नेमणूक होई. संपर्काची जबाबदारी बहुतेक वेळा स्त्रियांवर असे. मिटींगबाबत सर्वांना कळवणे, जिल्हा माहिती केंद्रांना निरोप देणे इत्यादी कामे त्याच करीत. आपल्या खेडचाकडे पोलीस येताहेत ही बातमी ढोल, बिगुल वाजवून लोकांपर्यंत पोचविणे, त्याना सावध करणे, हे काम सुद्धा काही वेळा स्त्रिया करीत.

## कुठल्याही कामगिरीत स्त्रिया मागे राहिल्या नाहीत !

पोलिसांचे दडपण वाढले आणि संघटना भूमीगत झाली तसे हे काम फारच जिकरीचे होऊ लागले. पण या काळात सुद्धा किसान सभेच्या कार्यकर्त्यांना अन्न पुरविणे, त्यांना आश्रय देणे ही कामे स्त्रियांनी केली. या काळात स्त्रियांनी दाखविलेला कर्तृत्वाच्या, धैर्याच्या, निष्ठेच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. कार्य-कर्त्याला धरपकडीबद्दल पूर्वसूचना देण्यासाठी त्या मैलोनमैल पायी प्रवास करीत. स्वतःच्या अटकेचा धोका पत्करूनही कार्यकर्त्यांना मदत करीत. १९४८ ते ५१ या काळात काही ठिकाणी ही चळवळ जमीनदार, पोलीस व सैन्य यांच्या विरोधात सशस्त्र चळवळ म्हणून उभी राहीली. भारतीय राष्ट्रीय सेनेतील एका माजी सैनिकाच्या नायकाकडून स्त्रियांना लढाईचे शिक्षण दिले गेले. अधिकाधिक पुरुष जसे तुरुंगात डांबले जाऊ लागले तसतशी स्त्रियांची जबाबदारी वाढली.

किसान सभेच्या कार्यकर्त्यांच्या सुटकेच्या संदर्भात स्त्रियांनी बजावलेली कामगिरी फार मोठी होती. पोलिसांना घेराओ घालणे, पोलीस कस्टडीतून कार्य-कर्त्यांची सुटका करणे, पोलिसांना निशस्त्र करणे, त्यांच्याशी वेळ आल्यास मुकाबला करणे अशा अनेक घटनांमध्ये स्त्रियांनी आपण होऊन घेतलेला सहभाग,

नेतृत्व, धैर्य, प्रसंगावधान निश्चितच विलक्षण होते. या लढ्यातील स्त्रियांची शस्त्रे तरी कोणती होती? कोयता, कुऱ्हाड, सुऱ्या, केरसुण्या आणि मिरच्याची पूड सुद्धा! दिनाजपूर येथे फुलेश्वरीच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी संपूर्ण दिवसभर पोलीसांना घेराओ केला. एका स्त्रीने पोलीसांच्या होडीला जाण्यास मज्जाव करून कार्यकर्त्यांची सुटका केली. एका स्त्रीने पोलिसांच्या हातातील बंदूक हिसकावून घेऊन मोडून टाकली व त्याला संघटनेचा आदेश मिळेपर्यंत डांबून ठेवले. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. स्त्रियांच्या मोठ्या प्रमाणावरील सहभागामुळे गोळीबारात ठार झालेल्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण मोठे होते.

वाढत्या चळवळीबरोबर खेडे विभागातून जनता न्यायालये उभारली गेली. अशा न्यायालयामध्ये स्त्रिया आपल्यावर होणाऱ्या कौटुंबिक अन्यायाविरुद्ध दाद मागू लागल्या. दिनाजपूर येथे स्त्रियांनी नवरे मारहाण करतात त्याविरुद्ध तक्रारी नोंदविल्या.

चळवळीमध्ये पुढाकार घेतलेल्या बहुतेक स्त्रिया ह्या मागास वर्गीय जाती-जमातीतील होत्या. उच्च वर्गातील हिंदू व मुस्लीम स्त्रियांची भागीदारी एवढ्या मोठ्या प्रमाणावर नव्हती. अर्थात जिथे चळवळ फारच तीव्र होती त्याठिकाणी मुस्लिम स्त्रियाही आपले बुरखे फेकून देऊन लढ्यात उतरल्या. मागसवर्गामध्ये कौटुंबिक नीतीमत्तेच्या कल्पना जाचक नव्हत्या. पुनर्विवाहाला सामाजिक मान्यता होती. वैधव्य हे मोठा अडथळा नव्हते. काही विधवा स्त्रियांनी चळवळीचे नेतृत्व केल्याचे दाखले आहेत.

## चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाची कारणे तरी काय?

तेभागा चळवळीतील स्त्रियांच्या एवढ्या मोठ्या प्रमाणावरील सक्रीय सहभागाची कारणे काय? या पूर्वी झालेल्या चळवळीत त्यांनी कधी एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाग का घेतला नाही? १९३९-४० मधे शेतीवरील कर कमी करा या मागणीसाठी झालेल्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग होता, पण सक्रीय नाही. अर्थात या चळवळीत श्रीमंत शेतकऱ्यांना अधिक फायदा होता. त्यामुळे सामान्य शेतकरी त्यात मोठ्या प्रमाणावर उतरला नाही.

तेभागा चळवळीतील मागण्या ह्या खास करून गरीब शेतकऱ्यांच्या मागण्या होत्या. या विभागातील स्त्रियांना शेतात आणि घरात दोन्हीकडे राबावे लागे. त्यामुळे आर्थिक शोषणाची प्रत्यक्ष झळ त्यांना सोसावी लागत होती. कामातील सहभागामुळे त्यांना कुटुंबात अधिक बरोबरीची वागणूक मिळे. पण तरीही शेतातील व घरातील कामाच्या जबाबदारीमुळे स्त्रियांचा एरवीचा राजकारणातील सहभाग हा फारच मर्यादित होता. पण तेभागा चळवळीने घेतलेले प्रश्न हे अधिक व्यापक स्वरूपाचे, अधिक महत्त्वाचे असल्यामुळे त्यांचा चळवळीतील सहभाग वाढू शकला, अधिक अर्थपूर्ण झाला.

या चळवळीची व्याप्ती व तीव्रता हा एक या चळवळीतील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यास कारणीभूत ठरलेला घटक होता. प्रत्येक खेडे त्यामध्ये सहभागी होते. ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिक्रिया होत होत्या. निदर्शने, पोलिसांविरुद्ध आंदोलन हे स्थानिक पातळीवर चालले होते. तालुक्याच्या गावी मोर्चाने जाण्यापेक्षा आपल्या खेडेगावात लढा चालू ठेवणे स्त्रियांना अधिक सुकर असल्याने त्यांचा सहभाग दीर्घकाल टिकू शकला.

तेभागा चळवळीतील सक्रीय सहभागामुळे स्त्रिया बरेच काही शिकल्या. संघटनेचे प्रभुत्व ज्या भागात जास्त होते व खेड्याची सर्व सूत्रे जवळपास संघटनेच्या हाती आली होती अशा ठिकाणी स्त्रिया खास करून स्वतःचे प्रश्न पुढे आणू लागल्या. तिचे दुय्यम स्थान, शोषण उघड उघड सिद्ध करणारी तिच्या वाट्याला रोजच येणारी घटना म्हणजे नवऱ्याचा मार, विशेषतः दारुड्या नवऱ्याचा मार, या विरूद्धची तक्रार तिने चव्हाट्यावर मांडायला सुरुवात केली. संघटनेतील कार्यकर्त्यांकडून काही आगळीक झाली तरी त्यांना योग्य शिक्षा देण्यात त्या दक्ष होत्या. अशा प्रसंगी सामाजिक बहिष्कार किंवा इतर दडपण आणून या लोकांना वठणीवर आणले जाई.

चळवळीचा भर ओसरल्यानंतर जेव्हा सुरक्षा समितिची स्थापना झाली, त्यामधील स्त्रियांचा सहभागही

सक्रीय होता. जिल्हाधिकाऱ्याकडे त्यांनी खालील मागण्यासाठी निदर्शने केली. १) तुरुंगात डांबलेल्या शेतकरी बांधवांची सुटका करा. २) खेड्यामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या लुटालुट करणाऱ्या, स्त्रियांना उपद्रव देणाऱ्या जमीनदारांना, गुंडांना शिक्षा करा.


चळवळीतील सहभाग, चळवळीविषयक तांत्रिक शिक्षण, संघटन, राजकीय जाणीव यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास, ताकद वाढली. पुरुषांनाही याची दखल अर्थातच घ्यावी लागली. केवळ शस्त्रे कशी चालवावयाची एवढेच शिकून त्या थांबल्या नाहीत, तर राजकारणही त्या समजावून घेऊ लागल्या. कामगारांचे राज्य येणे म्हणजे काय ? आपले हक्क कोणते ? इत्यादी विषयी त्या चर्चा करू लागल्या. साक्षरता प्रसाराच्या मोहिमा काढल्या. जोतेदाराकडे घरकामास असलेल्या स्त्रियांनी कामाचे तास ठरवून द्यावे व वेतन महिला समितिमार्फत द्यावे अशी मागणी घेऊन झगडा दिला. अशा प्रकारे चळवळीतील सक्रीय सहभागामुळे प्रत्यक्ष कृतीमधून त्यांच्या जाणीवा अधिक विकसित झाल्या. सामाजिक प्रश्नांविषयी त्यांची समज वाढली. त्यामुळे स्त्री म्हणून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दलचे प्रश्न पुढे येऊ लागले.

पण चळवळीचा भर जसा हळूहळू ओसरू लागला तसा स्त्रियांचा सहभागही कमी होऊ लागला. त्याला कायम स्वरूप मिळू शकले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे चळवळीवर मोठ्या प्रमाणावर झालेली दडपशूक. १९४८ ते ५१ या काळात महिला आत्मरक्षा समिती व किसान सभा या दोन्ही संघटना बेकायदा ठरविण्यात आल्या. त्यांच्यावर बंदी घातली गेली. त्यामुळे त्यांचे बहुतेक कार्यकर्ते व संघटक भूमिगत गेले. कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखेरीज नव्यानेच जन्माला आलेली ही चळवळ पुढे जाणे, टिकणे शक्य नव्हते.

शेवटी, तेभागा चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचे स्वरूप आणि चळवळीच्या मर्यादा याचा थोडक्यात विचार करणे उपयुक्त ठरेल. तेभागा चळवळीतील स्त्रियांचा सहभाग हा प्रामुख्याने पुरुषांना मदत देण्याच्या स्वरूपाचा होता. तर कधी पुरुषांना संरक्षण देण्यासाठी त्या पुढे आलेल्या आढळतात. पुरुष वर्ग मोठ्या प्रमाणात तुरुंगात किंवा भूमिगत गेल्यावर मात्र जबाबदारीची कामे स्वतंत्रपणे त्या संभाळू लागल्या. परंतु तीही मुख्यतः पुरुषांच्या गैरहजेरीत. पुरुष परत आल्यावर स्त्रियाही आपल्या दुय्यम स्थानावर नकळत सरकलेल्या दिसतात.

चळवळीबरोबर त्यांनी स्त्री म्हणून काही अन्याय होतात असे विशिष्ट प्रश्न पुढे आणले खरे. परंतु ते चळवळीच्या रेट्याबरोबरच त्यांना मांडता आले. चळवळीचा जोर ओसरल्यानंतर स्वतंत्रपणे त्या मागण्या करण्याइतके स्त्री संघटनही पक्के झालेले नव्हते. चळवळीच्या मर्यादित काळामध्ये नव्या वातावरणात बायकांना मारहाण करण्यापासून परावृत्त झालेले पुरुष पुन्हा जमीनदाराच्या जोखडाखाली कामास लागल्यावर त्यांचे दारू पिणे आणि बायकोला मारहाण करणे सुरू झाले. तेभागा चळवळीतून स्त्रियांच्या जाणीवा जरूर उंचावल्या, आत्मविश्वास वाढला. परंतु तेभागा चळवळीने सुरू केलेला लढा आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकला नाही आणि साहजिकच स्त्रियांच्या पारंपारिक स्थानामध्ये व सामाजिक सहभागामध्ये दूरगामी बदल झालेले आढळून आले नाहीत.

(एंद्रिन कूपर यांच्या इंग्रजीतील निबंधावरून संक्षिप्त रुपांतर)



'ये. ये पिक्या. कसं काय येणं केलंस ?

'भावसाब मी खाली जाऊ ? पाटलाच्या गड्यानं पाटलाला विचारलं. 'तू आता इथेच थांबलं पायजेस' पाटील म्हणाले.

'काय पिक्या काय हुकूम आहे.'

'पाटील आता निकाल तुमच्यासारखा झाला. माझ्या कामगीरीचं बक्षीस मला देताय नव्हं ?'

'कसलं बक्षीस ?' तांबारलेलं डोळं वटारून पाटलानं पिक्याला विचारलं.

'दहा गुंठे जमीन !'

पाटील भेसूर हसत म्हणाला. 'पिक्या, अरे फणसाचा गरा खाल्यावर बी फेकून द्यायची असते, दुनियेचा रिवाज हा. काळीभिन्न पिकावू जमीन तुला देवून मी काय हरीश्चंद्रागत तुझ्या घरी आयुष्यभर पाणी वहात बसू का कच्च्या घागरीनं ? आता तू काम केलं आहेस खरं... तर हे घे शंभर रूपये. व्याज नको देवूस. मुद्दल तरी फेडशील ना सावकाश ?'

पिक्याला भूकंपाचा हादरा बसल्यासारखं झालं. त्याच्या डोळ्यातून लाल इंगळ बाहेर पडू लागलं. पिक्याच्या लालबुंद डोळ्याकडं बघण्याचं धाडस पाटलाचं झालं नाही.

पिक्या पाटलाच्या अंगावर धावून गेला. भिम्यानं त्याला मागं खेचला. पाटील शर्टाची कॉलर झाडीत भिम्याला म्हणाला, 'भिम्या बघतोस काय. दे एक फायीट. तीचं भनं धेडगं आमाला शिवून मारतय.'

पिक्या पायऱ्यांवरून गडगडत खाली गेला. उठला आणि बाहेरच्या झिंगणाऱ्या अंधारात गडप झाला. पाटील भिम्याला म्हणाला.

'त्वांड काय बघतोस माझं. ट्रॅक्टरच्या टाकीतलं 'डिझेल' काढा. उद्या सकाळच्याला म्हारावड्यात सगळी राख दिसली पाहिजे.'

भिम्या निघून गेला. पाटील कॉटवर आडवे झाले. आज खरी त्याची चैनीची झोप होती. पाटील चैनीची सुखाची झोप घेत होते.

आणि पिक्या माडीवरच्या खिडकीतून कुऱ्हाडीसह आत उतरला होता.

**— सुरेश शिगटे**, विरमाडे (ता. वाई)

---

**श्रमिक महिला संघटना–कोल्हापूर**

# बेकारीग्रस्त महिलांचे प्रयत्न

श्रमिक स्त्रियांमधील दिवसेंदिवस अधिक उग्र बनत चाललेल्या बेकारीच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी येथील श्रमिक महिला संघटनेने कामाची निकड असलेल्या स्त्रियांच्या आवश्यक माहितीसह त्यांच्या सह्यांचा अर्ज महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सादर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सुमारे दीड महिना कार्यकर्त्या भगिनींनी चिकाटीने काम करून अशा २३०० च्यावर महिलांच्या सह्यांचा अर्ज मुख्यमंत्र्यांना सादर करावयाचे ठरवले.

महिलांनी दिलेल्या निवेदनात शासकीय, निमशासकीय संस्था, सहकारी व खाजगी उद्योगधंदे यांत भरती करतांना स्त्रियांच्या नोकऱ्यांचे प्रमाण वाढवावे. आय्. टी. आय्. सारख्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थात स्त्रियांसाठी अधिक व्यवसायांच्या प्रशिक्षणाची सोय करावी. शेतमजूर व समाजातील तळच्या थरांतील बालकांसाठी पाळणाघरे व बालवाड्या शासनाने स्वखर्चाने चालवाव्यात., नगर पालिकेच्या व जिल्हा-परिषदेच्या प्राथमिक वर्गांना जोडूनच बालवर्ग काढावेत, प्राथमिक व माध्यमिक शाळांतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ६० वरून ४० वर आणावी, वर्गांची संख्या वाढवावी, क वर्ग नगर पालिकांप्रमाणेच अ व ब वर्गाच्या नगरपालिका क्षेत्राला व महानगरपालिका क्षेत्रालाही रोजगारहमी योजना लागू करून अकुशलांबरोबरच कामाची गरज असणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित-अशिक्षित व्यक्तींची उद्योग-विनिमय केंद्रात नोंद करून तिला रोजगार पुरविण्याची अथवा निर्वाहभत्ता देण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी या मागण्यांचा समावेश आहे.